# पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ–३, मुंबई.
# वनराई पोलीस ठाणे, मुंबई

## <u>प्रेस नोट</u>

दिनांक : 08/08/**2026**

**<u>९४ लाख रुपयांची फसवणूक करून २ वर्षांपासून फरार असलेल्या २ आरोपींना रायपूर, छत्तीसगढ येथून अटक केलेबाबत.</u>**

वनराई पोलीस ठाणे गु.र.क्र. ४००/२०२५ मधील तक्रारदार श्री. प्रशांत हरी शेट्टीकर (व्हाईस प्रेसिडेंट, 'बॉक्स एन फ्रंट लॉजिस्टिक्स सोल्युशन प्रा. लि.') यांच्या कंपनीचे तत्कालीन झोनल हेड देव शर्मा याने 'एम ट्रकी ऑनलाईन ट्रान्सपोर्ट'चे मालक रवी गुप्ता आणि 'फ्राका शिपिंग'चे मालक (अंकिता राय, प्रगति सिंह व वीरेंद्र तन्वर) यांच्याशी संगनमत केले. प्रत्यक्षात कोणतीही माल वाहतूक न करता, केवळ कागदोपत्री व्यवहार दाखवण्यासाठी या सर्वांनी बनावट ई–वे बिल, खोट्या पावत्या आणि प्राप्तकर्ता कंपनीचे बनावट स्टॅम्प च्या आधारे आरोपींनी एकमेकांशी संगनमत करून तक्रारदाराच्या कंपनीची ९४ लाख रूपयांची मोठी आर्थिक फसवणूक केली होती.

गुन्हयाच्या तपासकामी पथक रायपुर,छत्तीसगढ या ठिकाणी रवाना होउन तपास सुरू केला असता आरोपीतांनी आपले अस्तित्व लपवण्याकरीता पुरेंपुर खबरदारी घेतली होती तरीदेखिल तांत्रीक तपास तसेच प्रत्यक्ष रित्या आरोपीचा पुर्विचा वावर असलेल्या परिसर इत्यादी गोष्टींचा बारकाईने तपास करून मुख्य आरोपी कमलेश साहू यांस सेक्टर २७,नया रायपुर व  वीरेंद्र तन्वर याचा पाठलाग करून त्यास अरण्य भवन,फॉरेस्ट डिपार्टमेंट मुख्य कार्यालय परीसर,नया रायपुर या ठिकाणाहुन गुप्त माहितीच्या आधारे सातत्यपूर्ण पाठपुरावा करून दि. ०६/०८/२०२६ रोजी दोन्ही आरोपींना रायपूर (छत्तीसगड) येथुन यशस्वीरित्या अटक करण्यात आली.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. मनोजकुमार शर्मा (कायदा व सुव्यवस्था), मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री.शशिकुमार मीना(उत्तर प्रादेशिक विभाग), मा. पोलीस उप आयुक्त श्री.गजानन राजमाने (उत्तर परिमंडळ ३), मा. सहाय्यक पोलीस आयुक्त विजय भिसे(दिंडोशी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अब्दुल रऊफ शेख, पोलीस निरीक्षक महेश गिरमे, पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र पोस्टुरे,पोलीस उप निरीक्षक रंजित वनवे, पो.ह. सतिश येवले, पो.शि साजिद शेख,यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याकरता गतीमान कारवाई करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे.




vivo V50 | ZEISS

23mm f/1.88 1/50s ISO978
08/08/2026, 00:11